www.mahadiscom.in

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## प्रसिध्दीपत्रक

दि. १२/१२/२०२५ रोजी 'कनिष्ठ अभियंता' पदांच्या भरतीबाबत "जाहिरात क्र. ०५/२०२४ असलेली पदे भरण्यासाठी विशेष भरती मोहिमेअंतर्गत कनिष्ठ अभियंता या पदांकरीता निवड झालेल्या उमेदवारांची परिमंडळ निहाय निवड यादी" असलेल्या मथळयाखाली सदर यादी समाज माध्यमामध्ये (WhatsApp) द्वारे मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत असलेचे निदर्शनास आले आहे. याबाबत, अनेक उमेदवारांकडून कंपनीकडे दूरध्वनीवरून विचारणा होत आहे.

या संदर्भात सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, सदर व्हायरल होत असलेली यादी ही महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. मार्फत प्रसिद्ध करण्यात आलेली नाही. सदर माहिती यादी ही पूर्णत: बनावट, खोटी व दिशाभूल करणारी आहे. अशा प्रकारची खोटी माहिती पसरवणाऱ्या व्यक्तींविरूद्ध कंपनीकडून कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

कंपनीच्या सर्व प्रकारच्या भरतीविषयक अधिकृत जाहिराती, सूचना व माहिती, निवडसूची इ. फक्त कंपनीच्या अधिकृत संकेतस्थळावरच (www.mahadiscom.in) प्रसिद्ध केल्या जातात. सबब, सर्व उमेदवारांनी कंपनीच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध होणाऱ्या सूचनांवरच विश्वास ठेवावा, असे याद्वारे आवाहन करण्यात येत आहे.

**Sd/-**

**दिनांक :** १४/०१/२०२६

**सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं-सेप्र)**